<u>नियमित दिवाणी दावा क्र. ६१/२००५ मधील नि.क्र. १०७ वरील आदेश</u>

<u>(अरुण ननवरे वगैरे वि. वामन ननवरे)</u>

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र. २ब यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. वादीचे अर्जातील कथन की, सदरचा दावा सरस निरस मानाने वाटपासाठी व पृथकपणे कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील ७/१२ उतारा मौजे गुंजेगांव, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर गट क्र. १५/२ पाहता दावा मंजूर होवून अपिलात गेलेनंतर दरम्यानच्या काळात उता-यावरती दत्तात्रय बापू चौगुले व लक्ष्मण महादेव चौगुले यांची नावे आलेली आहेत. सद्यपरिस्थितीमध्ये दत्तात्रय बापू चौगुले व लक्ष्मण महादेव चौगुले हे दोघे सहधारक असल्याने व प्रस्तुतचा दावा वाटप होवून मिळणेसाठीचा असल्याने त्यांना प्रतिवादी म्हणून पक्षकार करणे कायद्याने आवश्यक व गरजेचे झाले आहे. तसे न केल्यास दाव्यास आवश्यक पक्षकारांचा बाधा येणेची शक्यता आहे. तरी दाव्यात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

प्रतिवादी क्र. ६) दत्तात्रय बापू चौगुले,
व.व. ४५ धंदाः शेती
७) लक्ष्मण महादेव चौगुले,
व.व. ५५ धंदाः शेती
दोघे रा. गुंजेगांव, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर.

३. प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल केले की, सदर अर्जातील व्यक्तींना दि.१७.०३.२००८ रोजी जमिनीची विक्री केली आहे. त्याची जाणीव मुळ वादी यांना आहे. तेव्हा वादी यांनी पक्षकार करणेबाबत तजवीज केली नाही. अर्जास मुदतीची बाधा येते. तरी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. दोन्ही पक्षकारांचा युक्तिवाद ऐकला.

५. अभिलेख पाहिला. सदरचा दावा हा सरस निरस मानाने वाटपासाठी व

पृथकपणे कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. मौजे गुंजेगांव येथील गट क्र. १५/२ चा उतारा हा दत्तात्रय बापू चौगुले व लक्ष्मण महादेव चौगुले यांचे नांवावर असल्याचे दिसून येत आहे. गट क्र. १५/२ हा दाव्याचा विषय आहे. सदर मिळकतीमध्ये दत्तात्रय बापू चौगुले व लक्ष्मण महादेव चौगुले यांचे नांव दावा मिळकतीवर दिसत असल्याने त्यांना पक्षकार करुन दाव्यात समाविष्ट करणे गरजेचे आहे. सदरचा अर्ज मंजूर झाल्यास, प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. दाव्यात गुंतागुंत न होणेकरिता किंवा एका वादाचे अनेक दावे न होणेकरिता, वादीने केलेली मागणी मंजूर करणे न्यायोचित ठरेल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी मागणी केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे. वरील दुरुस्ती दिवाणी संहिता प्रक्रियाचे आदेश ६ नियम १८ प्रमाणे आदेश तारखेपासून १४ दिवसाच्या आत करण्यात यावी.

३. वादीना असे आदेशित करणेत येते की, दाव्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

SHRUTI NILESH GANGWAL SHAH
Digitally signed by SHRUTI NILESH GANGWAL SHAH
Date: 2025.03.18 13:23:38 +0530

दि. १८/०३/२०२५

(श्रीमती श्रुती नि. गंगावाल-शहा)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मंगळवेढा.

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Order is same word to word, as per the original Order

(a) Name of the Stenographer : P.T. Jadhav

(b) Name of the Court : C.J.J.D., Mangalwedha, Dist. Solapur,

(c) Order signed by P.O. on : 18.03.2025.

(d) Order uploaded on : 18.03.2025.